Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी लाभाच्या योजनांच्या परिणामांचा अभ्यास व उपाययोजना

संशोधकाचे नाव
श्री. विनायक भुजंगराव सुरसे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्राचार्य, डॉ. दादासाहेब मोरे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश:-***

***प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. मानवाचा विकास हा शिक्षणातून होत असतो. त्यामध्ये प्राथमिक शिक्षण हे खूप महत्वाचे आहे. मानवी विकासाचा चाया म्हणजे प्राथमिक शिक्षण आहे. एखादी इमारत जर पक्की आणि मजबूत उभी करायची असेल तर त्याचा पाया हा भक्कम आणि मजबूत असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मानसाच्या जीवनाचा विकास साध्य करायचा असेल तर प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे आहे. आणि या प्राथमिक शिक्षणाचा प्राथमिक स्तर खूप महत्त्वाचा मानला गेला आहे भारताची भावी पिढी सक्षम आणि सुसंस्कृत घडवायची असेल तर प्राथमिक स्तरावरील शिक्षण महत्त्वाचे आहे. या टप्यात शिक्षणात दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप मोठी आहे. प्राथमिक स्तरावर विद्यार्थी टिकला पाहिजे व दर्जेदार शिक्षण त्याला मिळवले पाहिजे या दृष्टीकोनातून शासन विविध योजना राबवून प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिक व पोषणविषयक लाभ देण्याचा प्रयत्न करत असते. या संशोधना-चा मुख्य उद्देश म्हणजे अशा योजनांच्या प्रत्यक्ष फायद्याविषयी अभ्यास करून त्या अधिक प्रभावीपणे कशा राबविता येतीलयावर उपाययोजना सुचवणे. या संशोधनात खालील लाभाच्या योजनांचा अभ्यासकरून उपाययोजना सुचविल्या जातील.***

१. ***शालेय पोषणआहारयोजना***
२. ***मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप***

***संशोधनात अहिल्यानगर जिल्हयातील शेवगाव तालुक्यातील काही शाळांमध्ये प्रश्नावली, शिक्षक-पालक मुलाखती दुवारे माहिती गोळा करण्यात येईल व संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.***

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्त्वाचे शब्द :-** प्राथमिक शिक्षण, लाभाच्या योजना, विद्यार्थी

## १. प्राथमिक शिक्षणाची संकल्पना:-

"माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक उत्करतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण" असे महात्मा

गांधी यांनी म्हटले आहे. याचाच अर्थ मानवाच्या अंगी काही उपजत क्षमता किंवा गुण असतात त्या शिक्षणामुळे उत्कृष्ट बनतात. प्राथमिक शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे व्यक्तिचा अर्थातच बालकांचा साव सर्वांगीण करणे हे होय. बदलत्या काळानुसार शिक्षण हा महत्त्वाचा घटक बनला आहे. त्यासाठी शिक्षणाची सुरुवात चांगल्याप्रकारे होणे आवश्यक आहे. अशा उत्कार शिक्षणाची सुरुवात प्राथमिक शिक्षणापासून होते.

लोकशाही राज्यपध्दती असलेल्या विकसनशील भारतात एक आदर्श आणि सुसंस्कृत नागरिक तयार करण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण महत्वाची बाब आहे. लोकशाही शिक्षणाचा व शिक्षण व्यवस्थेचा मूलभूत पाया प्राथमिक शिक्षणातून बालला जाती. भावी जीवन विकासाचे वीजशिपण करण्यासाठी, समाज शिक्षणाचा पाया घालव्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय.

**२. लाभाच्या योजना:-**

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी आकर्षित करण्यासाठी व त्यांचे शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी सरकार विविध योजना राबविते त्या योजना म्हणजेच विद्यार्थी लाभाच्या योजना होय. या योजनामध्ये पुढील प्रकार सांगता येतील.

**अ) मध्यान्ह भोजन योजना (MDM):-**

विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार देऊन त्यांच्या अशिग्यावर व उपस्थितीवर सकारात्मक परिणाम करणे.

**ब) मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप :-**

गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करणे. सध्या । सरसकर विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश दिला जातो.(स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा)

**क) शिष्यवृत्तीयोजना:-**

आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देणे.

**३ विद्यार्थी :-**

विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेतील एक मुख्य घरक आहे. विद्यार्थ्याला ज्ञान, कौशल्ये, मूल्ये व संस्कार आत्मसात करून स्वतःचा सर्वांगीण विकास साधायचा असती. तो केवळ शैक्षणिक माहिती ग्रहण करणारा नसून, शिक्षक, पालक, समाज आणि शाळा यांच्या परस्पर संबंधातून घडणारा एक सक्रिय शिकणारा घटक आहे.

विद्यार्थी म्हणजे एक शिकणारा, वाढणारा, घडणारा आणि समाजाशी सुसंवाद साहघमारा घटक आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थीच असल्यामुळे सर्व शैक्षणिक योजना व धोरणे याच्या गरजावर आधारीत असतात.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्व आहे. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास गिबे सरकार वेळोवेळी विविध लाभदायी योजना राबवत असते. आले आहे. याच त्या विद्यार्थी लाभाच्या योजना होय.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) (२०२०), सर्व शिक्षा अभियान या माध्यमातून प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांसाठी विविध योजना सरकारद्वारे राबविण्यात आल्या आनि येत आहेत. या योजना प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुरु करण्यात आल्या. त्यापैकी काही योजनांची ऐतिहासिक

पाश्र्वभूमी समजावून घेऊया.

**१. शालेय पोषण आहार योजना:-**

प्राथमिक शिक्षण प्रत्येकाला मिळावे, कुपोषणाची समस्या दूर व्हावी. वेव शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणाचा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून भारत सरकारने सन १९९५-९६ पासून ही योजना सुरु केल केली. या योजनेअंतर्गत सन १९९५ ते २००२ पर्यंत कोरडा आहार म्हणजे फक्त तांदूळ दिला जायचा त्यासाठी ८०% उपस्थितीची अट होती. परंतु त्यात काही समस्या निर्माण झाल्यामुळे सन २००२ पासून आदिवासी भागात तर जानेवारी २००३ पासून राज्यातील अनुदानित शाळांमध्ये तांदूळ शिजवून देण्याची योजना सुरु राबविण्यात आली. महाराष्ट्र राज्यामध्ये झलिय पोषण आहार योजना २२/११) १९९५ पासून इयत्ता १ली ते प्रवी साठी रप्यारण्याने सुरु झाली. तसेच पुढे २००८ पारन ३० छवी ते वी साठी ही योजना विस्तारली गेली. सुरुवातील विद्यार्थी उपस्थिती लक्षात घेऊन तीन किलो तांदळाची पिशवी शैक्षणिक वर्षात १० महिन्याकरीता वाटप करण्यात येत होती. सन २००१-२००२ पर्यंत लाइक वाटपाची योजना चांगल्या प्रकारे चालली होती.

**योजनेची सद्यस्थिती :-**

शालेय पोषण आहार योजनेत दि.१८८६/२००९ च्या शासन निर्णयानुसार काही सुधारणा केल्या गेल्या व त्या १० जुलै-२०१० पासून लागू झाल्या.

१. ग्रामीण भागात तांदूळ व इतर धान्यादीमालाचा पुखणथेट शाळांना होणार (उदा. कडधान्य, तेल, मिठ, मिरची, हळद, जिरे, मोहरी इ.)
२. शहरी भागातील शाळांना तांदळाची वाहतूक किंवा केंद्रीय स्वयंवाक गृखचा अवलंब केला असल्यास तेथपर्यंत तांदळाचा पुरवण करणे.
३. शिक्षण संचालक (प्राथमिक) व महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ली. मुंबई यांच्यातील दिनांक २३ ऑक्टो. २००९ ला झालेल्या करारानुसार तांदूळ उपलब्ध होतो
४. प्राथमिक स्तरावरील विद्याथ्यासाठी प्रति विद्यार्थी १०० ग्रॅम तांदूळ, ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने आप्रमाण मिळावीत.
५. दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मयदि ३०१ली ते प्रवी साठी ५:१५ पैसे अशी होती
६. दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये इ.१ली-ते प्रवी साठी प्रतिदिन प्रति लाभार्थी रु. ६.१९ इतके खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
७. सदरची दरवाढ दि. १ मार्च २०२५ पासून लागू करण्यात आली आहे
सध्या शालेय पोषण आहार या योजनेचे नाव प्रधानमंत्री पीषण शक्ती निर्माण योजना असे आहे.

**२. मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप:-**

❖ मोफत पाठ्यपुस्तके :- मोफतपाठ्य-पुस्तके योजनाही शैक्षणिक समता साधण्याचे, गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रभावी साधन उरले आहे.स्वातंत्र्यानंतर १९५० च्या दशकात भारतीय राज्यघटनेच्या

कलम ४५। नुसार काही राज्य सरकारांनी गरीब विद्यार्थ्यांना मोफतपाठ्यपुस्तके देण्यास सुरुवात केली.

- राष्ट्रीय धोरण१९८६ व १९९२ मध्ये विद्यार्थ्यांचे गळतीचे. प्रमाण कमी करण्यासाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला.
- सर्व शिक्षा अभियान (२००१) च्या माध्यमातून मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या धर्तीवर सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा-लाभ दिला गेला.

➢ **योजनेची सद्यस्थिती :-**

सध्या महाराष्ट्रामध्ये अनुदानित शाळामध्ये १००%, विद्याथ्याना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येत आहेत.

❖ **मोफत गणवेश वाटप**

- स्वातंत्र्यानंतर १९५० ते १९८० या कालावधी मध्ये गणवेश अनिवार्य नव्हते. काही खाजगी शाळांमध्ये तो वापरत होते. हळूहळू शालेय शिस्त, एकरूपता आणि सामाजिक समतेसाठी शासकीय शाळांमध्ये लागु केला गेला.
- १९८०-१९९० या दशकात काही राज्यांनी स्थानिक स्तरावर गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यास सुरुवात केली मान ही योजना मर्यादीत स्वरुपात होती.
- २००१ नंतर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गरीब, अनुसूचित जाती-जमाती व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश योजना अधिक प्रभावीपणे लागू केली.
- २००९ - शिक्षक हक्क कायदा (RTE ACT) या कायदानुसार प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याची जबाबदारी शासनावर निश्चित करण्यात आली.

**योजनेची सद्यस्थिती :-**

महाराष्ट्रामध्ये सध्या राज्य स्तरीय निधित्तून वर्षातून दोन वेळा गणवेश वाटप, स्थानिक स्वयंसहायता गटामार्फत शिवणकार्य करून विद्याथ्यार्थ्यांना पुरविले जातात. त्यासाठी शाळा स्तरावर शलिय व्यवस्थापन समिती महत्त्वाची भूमिका बजावले.

**समारोप :-**

संशोधकाने त्याच्या संशोधन विषयाची संकल्पनात्मक ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती मोडली आहे.

**संदर्भसूची:-**

१. खडकी इंदिरा. (२००८). पोषण व आहारशास्त्र, पुणे हिमालय प्रकाशनः
२. गद्रे गीता, गद्रे ल.२). (१९७७), शिक्षणाचा इतिहास. पुणे -नूतन प्रकाशन

३. पवार ए., कुलकर्णी आर. (२०२१) शालेय शिक्षण आणि समाजः योजना, अडचणी आणि उपाय. पुणे ज्ञानदीप प्रकाशन,

४. प्राः भाळवणकर भा. गो. (२००६) प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती समस्या व उपाय, पुणे - सुविचार प्रकाशन,

५. भारत सरकार (2020) Samagra shiksha Abhiyan!- Guidline नवी दिल्ली: मानव संसाधन विकास मंत्रालय,

६. महाराष्ट्र शासन (वर्षानुसार) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या योजना व वार्षिक अहवाल: मुंबई महाराष्ट्र 'सरकार',